International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.1 Sept – Oct 2022

# स्त्री चळवळीचा समाजशास्त्रीय अभ्यास

प्रा. कन्नाडे एम. के.
(सहायक प्राध्यापिका, समाजशास्त्र विभाग) राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कदमवाडी रोड, कोल्हापूर.
*Corresponding Author-* प्रा. कन्नाडे एम. के.
Email id: swamimamata@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.7266739

कोणत्याही समाजात निर्माण झालेल्या सामाजिक समस्यांचे निर्मुलन करण्यासाठी मोठया समुदायाद्वारा केला जाणारा सामुहिक प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय. सामाजिक चळवळ ही समाज वा संस्कृतीत नवीन परिवर्तन करण्यासाठी किंवा त्या परिवर्तनाला विरोध करण्यासाठी निर्माण होते.

**सामाजिक चळवळीचा अर्थ :**

हर्बर्ट ब्लुमर यांच्या मते " जीवनात एक नवी व्यवस्था स्थापन करण्यासाठी केलेले सामुहिक प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय."

**संशोधनाचा उद्देश :**

1. प्राचीनकाळातील स्त्रियांच्या स्थितीचा अभ्यास करणे.
2. वेगवेगळया चळवळीतील स्त्री सहभागाचा अभ्यास करणे.

**अभ्यास पध्दती:**

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम साधनसामग्री वर आधारित आहे. या विषयाच्या अभ्यासासाठी पुस्तके, वर्तमानपत्रे आणि इंटरनेटद्वारे माहिती गोळा करून विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. रूग्वेद काळापासून स्त्रीच्या बंडखोरीला सुरूवात झाली. या काळात स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार होता. परंतु बोटावर मोजण्याइतक्या स्त्रिया शिक्षण घेत होत्या. इ. स. च्या आठव्या नवव्या शतकापर्यंत विदुषी आणि कर्तबगार स्त्रियांचे उल्लेख आढळतात. याशिवाय सैनिकी शिक्षण घेऊन पराक्रम गाजविणाऱ्या स्त्रिया आणि राजकारणाचे धडे घेऊन राज्यकारभार चालविणाऱ्या स्त्रियांचा उल्लेखही आढळतो. परंतु या सर्व स्त्रिया उच्च वर्णीय आणि श्रीमंत कुटुंबातील होत्या. सामान्य स्त्रियांच्या बाबतीत मात्र अंधारयुग होते.

स्त्रीचा विवाह आणि नंतर पुत्र जन्म या कसोटया स्त्रियांची योग्यता सिद्ध करत होत्या. सतीप्रथेचा उल्लेख वेदकाळात आढळत असला तरी ती रूढ पध्दती नव्हती. इ. स. ७०० पासून पुढे सतिप्रथेचा पुरस्कार करणारे धर्मशास्त्रकार निघाले.

युध्दात जिंकलेल्या स्त्रियांवर तर खूप अन्याय होत असत. वारंवार होणाऱ्या युध्दामुळे स्त्रियांचे पुर्नविवाह बंद होऊन सती प्रथेला मान्यता मिळाली.

**स्त्री स्वातंत्र्याची गरज :**

स्त्रियांनी आपल्या स्वातंत्र्यासाठी चालविलेली चळवळ ही अलीकडील असली तरी स्त्रीचे अवलंबन फार पुरातन आहे. जगातील बहुसंख्य देशात स्त्री ही पुरुषाची दासी राहिली आहे. पुरुषी समाजाच्या विचारामुळे स्त्रियाना अनेक वर्ष गुलाम म्हणूनच जगावे लागले आहे. एवढेच काय स्त्रियांचा व्यापारही केला जात होता. आम्ही जन्मापासूनच मुलींच्या संदर्भात विचार करतो की ती दुसऱ्यांची संपत्ती आहे. फ्रान्सची एक स्त्रीवादी लेखिका म्हणते, स्त्री जन्माला येत नाही तर तिला बनविले जाते. ज्वालामुखी एका दिवसात बाहेर येत नाही तर त्यास वेळ लागतो त्या अर्थाने स्त्रियांवरील अन्याय अत्याचाराच्या विरोधात विद्रोह एका दिवसात बाहेर येत नाही. एकोणिसाव्या शतकाच्या सातव्या शतकात "Women Lib" ची चळवळ जगातील प्रसिध्द व महत्वपूर्ण चळवळ मानली जाते. तसेच काही चिंतनशील व्यक्तींनी उदा. राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विदयासागर, दयानंद सरस्वती, केशवचंद्र सेन, महर्षी कर्वे इ. यांनी स्त्री बद्दल विचार मांडले. आंतरराष्ट्रीय महिला दशकामुळे १९७५ ते १९८५ सर्वसाधारण महिलांवरील समाजशास्त्राचे साहित्याला चांगले उत्तेजन मिळाले, त्यांचे समाजातील स्थान, लिंगावर आधारित केल्या जाणाऱ्या भेदभावामुळे

निर्माण होणारे मुद्दे आणि विशेषतः म्हणजे असमानतेची वागणूक. इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च ने लिंगावर आधारित अभ्यासात एकूण कार्यक्रमांमध्ये विशेष प्राधान्य दिले आहे. १९८० ते १९९० च्या दरम्यान लिंगासंबंधीच्या पैलूवर प्रकाश टाकणाऱ्या समाजशास्त्रीय साहित्यामध्ये लक्षात येण्याइतपत वाढ झाली आहे. कित्येक आलेख आणि निबंध स्त्रिया संबंधीच्या लिखाणात, भाषणात, सामाजिक आणि आर्थिक वर्तुळांमधील स्त्रियांच्या स्थानावर परिणाम करणारे मुद्दे यामध्ये "चळवळ" ही संज्ञा वापरतात. पाश्चात्य देशातील स्त्रियांच्या चळवळीचे भारतातील स्त्रियांच्या मुक्ततेच्या चळवळींवर विशेष परिणाम झाला. देशाच्या निरनिराळया भागांतील दंग्याचा अभ्यास केला असता स्त्रियांच्या सामाजिक मार्गावरील सहभागाचा पुरावा मिळतो.

वेगवेगळे अभ्यासक स्त्रियांच्या चळवळीचे वर्गीकरण आपापल्या तात्विक दृष्टिकोनाप्रमाणे करतात. नीरा देसाई म्हणतात, स्त्रियांची चळवळ म्हणजे समानता आणि स्वातंत्र हे समान ध्येय मिळविण्यासाठी केलेल्या संघटित प्रयत्न आणि स्त्रियांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या निर्णायक बाबींविषयी संवेदनशीलता त्यामध्ये गृहित धरलेली असते. भारतातील महिला चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या सरोज नलीनी दत्त व सरोजिनी नायडू या प्रमुख नेत्या होत्या.

**अखिल भारतीय महिला परिषद :**

महिलांच्या चळवळीत अखिल भारतीय महिला परिषदेस महत्वाचे स्थान आहे. या परिषदेने संपूर्ण भारतात विस्तार केला होता. यातून महिलांना एकाच मंचावर येण्याची संधी मिळाली. मुंबई मध्ये १९२०मध्ये अखिल भारतीय महिला परिषदेची स्थापना करण्यात आली. या परिषदेच्या माध्यमातून बालविवाह, विधवा पुनर्विवाह, श्रमिक महिलांच्या समस्या यासारख्या समस्यावर चर्चा केली गेली. याचा परिणाम जगातील राज्यकर्त्यांवर पडला त्यामुळेच UNO ने इ. स. १९७५ वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित केले.१९८० मध्ये महिला संघटनांनी आपले कार्यक्षेत्र बदलले त्या संघटना मोडत कायद्याचा सल्ला, रोजगार संबंधी माहिती आणि आरोग्यासंबंधी माहिती देवू लागल्या. ८ मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिवस घोषित केल्यानंतर भारतीय महिलांमध्ये नवीन जाणीव निर्माण झाली.

**स्त्री साहित्याची चळवळ :**

गेल्या दोन तीन दशकापासून स्त्रियांनी साहित्यांच्या माध्यमातून स्त्रियांच्या प्रश्नावर लिहिण्यास सुरूवात केली आहे. स्त्रियांच्या साहित्यांच्या लिखाणामुळे स्त्री चळवळीत प्रेरणा मिळत आहे. त्यातील काही स्त्रिया म्हणजे मेघा पाटकर, अरूंधती रॉय, महाश्वेता देवी, महाराष्ट्रात बहिणाबाई चौधरी पासून निलम गोऱ्हे, शर्मिला रेगे, छाया दातार, श्रुती तांबे इ. अनेक स्त्रियांनी स्त्रियांच्या प्रश्नावर अतिशय मार्मिकपणे विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**सामाजिक सुधारणेच्या चळवळी आणि स्त्रिया :**

सध्या भारतात सुरू असलेल्या स्त्रियांच्या चळवळींचा उगम गेल्या शतकात हिंदूमध्येच झालेल्या सामाजिक सुधारणेच्या चळवळीमध्ये सापडतो.

हिंदू धर्माने जरी स्त्रियांना गौण स्थान दिले होते. तरी स्त्री पुरूष तत्वाचे द्वैत शिव आणि शक्ती आणि वैदिक काळातील स्त्री पुरुषांची समानता यामुळे हिंदू पुनरूज्जीवनवादी सुधारकांना स्त्रियांचे स्थान सुधारण्यासाठी पाठबळ मिळाले. ब्रिटिश सत्तेमध्ये मुक्त शिक्षणाच्या भारतात खूप प्रसार झाला. वरच्या वर्गातील सुशिक्षित पुरुषांनी स्त्री पुरुषांमधील तफावत भरून काढण्यसाठी स्त्रियांच्या शिक्षणाला खूपच उत्तेजन दिले.

**स्वातंत्र्यसंग्राम आणि स्त्रिया :**

स्त्रियांना त्यांच्या मुक्तिसंग्राम मध्ये स्वातंत्र्यलढ्याचा फायदा झाला कारण स्त्रीवाद आणि राष्ट्रवाद हया एकमेकींमध्ये गुंतलेल्या गोष्टी आहेत. सुभाषचंद्र बोस यांनी महिला राष्ट्रीय संघ नावाची संघटना स्थापन केल्यामुळे स्त्रियांना स्वातंत्र्यसंग्रामामध्ये सक्रिय सहभाग घेता आला. गोविंद केळकर म्हणतात की अहिंसावादी लढा पार पाडण्यासाठी स्त्रिया जास्त योग्य असल्यामुळे त्यांना स्वातंत्र्यचळवळीसाठी एकत्र करण्यात आले.

स्वातंत्र्याच्या चळवळीत स्त्रियांच्या सहभागाने भिन्न वळण घेतले आणि तो सहभाग नेहमी सुसंघटित आणि सुसंबध्द नव्हता. पश्चिम भारतात महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये स्वातंत्र्यलढ्याच्या वेळी देशभक्तीची भावना जागवण्यासाठी प्रभात फेरी निघत असे. सगळया भारतभर, असंख्य स्त्रिया निर्वासित आणि भूमिगत व्यक्तींना अन्न पुरवत असत राजकीय कैद्यांना भेटत असत. सर्व बाहय गोष्टींपासून सुरक्षित असलेल्या घराच्या बाबतीत नवीन आणि बाहय उत्तेजनांशी सामना करत असत. स्त्रियांच्या चळवळीतील बहुतेक सहभाग हा अशाचा स्वरूपाचा समाज आणि घर यांच्यावर आधारित होता.

**स्वातंत्र्योत्तर काळात स्त्री चळवळ :**

वैदिक काळापासून स्त्रियांना आपल्या हक्कासाठी क्रांती करावी लागली. जगातील सर्व देशातील महिलांचा

विचार केला तर भारतीय महिलांसारखी दयनीय अवस्था दुसऱ्या कोणत्याही देशातील स्त्रीची नाही. आरोग्य, शिक्षण, रोजगार या आघाडयावर तिची पिछेहाट झाली असल्यामुळे हक्काचे महत्व तिला समजू शकले नाही.

स्वातंत्र्यानंतर फाळणीच्या काळात दंग्यामध्ये हरवलेल्या किंवा टाकून दिलेल्या स्त्रियांचा शोध व पुर्नवसन करण्यासाठी अनेक महिलांनी कार्य केले. याच काळात साम्यवादी महिलांनी भारतीय महिलांचा राष्ट्रीय संघ स्थापन केला. पण हा संघ केवळ एक राजकीय व्यासपीठ बनला होता. स्वातंत्र्योत्तर काळातल्या स्त्रियांच्या ज्या चळवळी तपासण्यात आल्या त्या चळवळी मोठया समुदायाच्या असून ज्यांच्यामध्ये स्त्रियांचा सहभाग आहे असा फार मोठा राजकीय किंवा सामाजिक बदल घडवून आणणे हे त्यांचे ध्येय आढळते असे उलिना सेन यांनी म्हटले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्पृश्यांद्वाराच्या चळवळीमध्ये स्त्रियांचा सहभाग मोठया प्रमाणावर आढळतो. नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहात स्त्रियांचा सहभाग फार मोठया प्रमाणावर होता. महाडच्या चवदार तळयावरच्या सत्याग्रहातही स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने लढल्या. १९७९ मध्ये वर्धा जिल्ह्यातील पवनार येथे एक विश्व महिला संमेलन भरवले होते. या संमेलनाच्या प्रमुख श्रीमती शोभना रानडे यांनी याबद्दल लिहितांना असे म्हटले आहे की, "रूढी आणि कायदे" बनविण्यात स्त्रियांचा कधीही हात नव्हता पण या रूढी कायदे आणि परंपरानी स्त्रीला अक्षरशः पायदळी तुडविले आहे. स्नेहाच्या आधारावर उभारण्याच्या जीवनामध्ये स्त्रीलाही आपल्या भवितव्याचा निर्णय घेण्याचा अधिकार असावा म्हणून सामाजिक आचार, व्यवहाराचे नियम या दोघांनीही एकत्र बसून आणि मनःपूर्वक राजीखुशीने ठरविले पाहिजेत.

स्त्री शक्तीची माहिती गावोगावी पसरविण्यासाठी आसाममधील हेमप्रभा भराली आणि लक्ष्मी फुकन, पंजाबच्या लक्ष्मी वेद आणि सिंधी देवी रिझवानी यांनी गावोगाव पदयात्रा करून व्याख्याने दिली. १९८१ मध्ये महिला आयोग स्थापन व्हावा म्हणून लोकसभेत बिल सादर करण्याचा प्रयत्न केला. पुण्यात १९८० मध्ये असंघटित महिला कामगारांचा प्रश्न हाती घेण्यात आला. १९ जून ते २ जुलै १९७५ मध्ये पहिली जागतिक महिला परिषद मेक्सिको येथे व दुसरी जागतिक महिला परिषद १४ जुलै ते ३१ जुलै मध्ये कोपनहेगन येथे घेण्यात आली. या परिषदेने निर्णय प्रक्रियेत व राजकारणात स्त्रियांचा सहभाग स्त्रियांसाठी आयोग नेमणे, त्यासाठी यंत्रणा करणे इ. विषयी चर्चा करण्यात आल्या.

इ. स. १९७० मध्ये व त्या दशकात स्त्रियांच्या चळवळीने व्यापक स्वरूप धारण केले. त्यात गांधीवादी आणि समाजवादी घटकांचा पुढाकार होता. हैदराबादला इ.स. १९७५ मध्ये प्रगतशील महिला संघटन बनविले. औरंगाबाद येथे लीग ऑफ वूमन सोल्जर्स नावच संस्था स्थापन करून तिच्याद्वारे स्त्री स्वातंत्र्याची मागणी केली. त्यांनी स्पष्ट म्हटले की, धार्मिक ग्रंथामध्ये स्त्रियांना आणि मागास जातींना दाबण्याचा प्रयत्न आढळतो. इ. स. १९७५ च्या आपत्कालीन घोषनेनंतर स्त्रियांची चळवळ सुरू झाली. परंतु १९७७ नंतर तिला गति प्राप्त झाली.

**शेतकरी चळवळी आणि स्त्रिया :**

मीरा वेलायुधन (१९८४) यांनी त्यांच्या विष्लेशणात्मक आणि सविस्तर अभ्यासात अलेप्पीच्या कामगार स्त्रिया आणि वर्गलढा त्यामधील स्त्रियांची केरळमधील कम्युनिस्टांनी चालवलेली काथ्या कामगारांची चळवळ यामधील स्त्रियांची भूमिका आणि सहभाग यांचा विचार केला. त्यांनी दाखवून दिलेली १९३८ च्या संपामध्ये स्त्रियांनी मोठया प्रमाणावर भाग घेतला. ते भागा चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाबद्दल पीटर कस्टर्स यांनी अभ्यास केला. त्यांनी हे दाखवून दिले की, मजूर वर्गातील आणि शेतकरी वर्गातील स्त्रिया परिणामकारकरीत्या नेतृत्व करतात. १९५८-६८ या काळात नक्षलवाद्यांकडून चालवल्या गेलेल्या श्रीकाकुलम चळवळीबद्दल विंध्या (१९९०) यांचे विचार असे आहेत की प्रचलित पितृसत्ताक विचार चळवळीतील आणि समाजातील स्त्रियांची लढयातील भूमिका आणि स्थान या दोन्हींवर परिणाम केला. जंगलातील ठेकेदारांच्या वृक्षतोडीला विरोध करण्यासाठी चिपको आंदोलनामध्ये स्त्रियांनी लढाऊ भूमिका पार पाडली.

**स्त्रियांच्या समस्यांवरील स्त्रियांची चळवळ -**

**हुंडा विरोधी चळवळ:**

हुंडा प्रथा ही भारतीय समाजाला लागलेला कलंक आहे. धर्मग्रंथात देवदेवतांच्या विवाह वर्णनात वधुपित्याने वधु सोबत मौल्यवान भेटवस्तू दिल्याचा उल्लेख असल्याचे दिसून येते. मध्ययुगात मात्र या हुडापध्दतीला आवश्यकतेचे रूप आले. पण आधुनिक काळात हुंडा देण्याच्या बाबतीत चढाओढ लागली आहे. परिणामी प्रथम टीका नंतर छळ आणि शेवटी हुंडाबळी असे चक्र सुरू होते. हुंडाबंदी कायदा १९६१ व त्यानंतर वेळोवेळी दुरूस्त्या करूनही हुंडा दिला व घेतला जातोच.

**हुंडा विरोधी चळवळीचे स्वरूप -**

स्वातंत्र्यापूर्वी अनेक समाजसुधारक, धर्मसुधारक आणि स्त्रियांनी या प्रथेच्या विरोधात मते मांडली आहेत. २० मे १९६१ रोजी केंद्रानेही हुंडाविरोधी कायदा केला. बिहार, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, दिल्ली, राजस्थान, मध्यप्रदेश, पश्चिम बंगाल मध्ये हुंडयाच्या विरोधात महिला संघटनांनी अनेक रॅली, धरणे, मोर्चे काढले आहेत. आजही काढीत आहेत. ३ ऑगस्ट १९८२ रोजी तीस संघटनांच्या मदतीने हुंडाविरोधी चेतना मंच गठीत झाले.

**देवदासी चळवळ :**

देवदासी म्हणजे एखाद्या देवतेला वाहिलेली मुलगी. अपत्यप्राप्ती करिता किंवा अपत्य जगण्याकरिता पहिले मुल देवाला वाहण्याचा नवस करित. देवदासी म्हणजे देवाची दासी होय. मंदिरात दासी ठेवण्याची प्रथा मध्ययुगात सुरू झाली, इ.स. १३५१ मध्ये भारताला भेट दिलेल्या अरेबियातील दोन मुस्लिम प्रवशांनी भारतातील वेश्यांना देवदासी म्हटले आहे. पण ही प्रथा युरोपातही आढळून आली आहे. युरोपातील बॅबीलोनमध्ये, नेदरलँड, जर्मनी या देशात ही प्रथा होती असे मानले जाते. इ. स. १९४७ साली देवदासी प्रथेविरूद्ध कायदा करण्यात आला. या कायद्याने देवदासींना विवाह करण्याचा अधिकार प्राप्त झाला. मोगल सम्राट औरंगजेबाचा देवदासी निर्मुलन चळवळीत रस होता. महाराष्ट्रात कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनीही याप्रथेला अमानवी प्रथा मानले.

**इतर चळवळी आणि स्त्रिया :**

इतर चळवळीमध्ये उदा. स्वातंत्र्याची चळवळ, शेतकऱ्यांची चळवळ, जमातींच्या चळवळी, विद्यार्थ्यांच्या चळवळी ह्या सर्व लढयामध्ये स्त्रियांची भूमिका महत्वाची आहे. स्त्रियांनी सामाजिक आणि राजकीय चळवळींमध्ये वैशिष्टपूर्ण भूमिका बजावली आहे.

**सारांश:**

महिलांच्या चळवळी गेली कित्येक वर्षापासून विविध समस्यावर भांडत असल्या तरी आज समाजाची स्थिती पाहिल्यावर असे दिसून येते की स्त्रियांना बलात्कार, हुंडा यासारख्या समस्यातून मुक्त होण्यासाठी मोठा लढा उभा करावा लागणार आहे.

**संदर्भसूची:**

१. प्रा. श्रीकांत गायकवाड व प्रा. रामकिशन मांजरे भारतातील सामाजिक चळवळी, अरूणा प्रकाशन, लातूर.

२. घनश्याम शहा अनुवाद प्राची चिकटे भारतातील सामाजिक चळवळी, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

३. डॉ. एस. जी. देवगांवकर व इतर सामाजिक चळवळी परंपरागत आणि आधुनिक, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

४. कुमुद करकरे स्त्री मुक्ती चळवळ, चिटणीस समाजवादी महिला सभा (महाराष्ट्र)

५. वी. एन. सिंह भारत में सामाजिक आन्दोलन, रावज व जनमेजय सिंह पब्लिकेशन, नई दिल्ली.